महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : २१ जून, २०२२.

क्रमांक:१२९७३/क-१ या सचिवालयातील प्रतिनियुक्तीमुळे रिक्त झालेल्या **"कक्ष अधिकारी"** (एस-१७-४७६००-१५११००) या पदावर सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे.

| अ.क्र | कर्मचाऱ्यांची नावे |
|---|---|
| १ | श्री. रो. मो. जाधव, सहायक कक्ष अधिकारी |
| २. | श्री. प्र. ज. टिबे, सहायक कक्ष अधिकारी |

२. संबंधित कर्मचाऱ्यांना कक्ष अधिकारी पदावर तात्पुरती पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

(अ) कक्ष अधिकारी संवर्गातील पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपात प्रशासकीय निकड म्हणून देण्यात येत आहे.

(ब) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित कर्मचाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ कक्ष अधिकारी यांचे प्रत्यावर्तन झाल्यानंतर त्यांच्यासाठी कक्ष अधिकारी संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास, या आदेशातील कनिष्ठतम कर्मचाऱ्याला पदावनत करण्याच्या अधिन राहून सदर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

(ड) कक्ष अधिकारी या पदावर सरळसेवेद्वारे उमेदवारांची नियुक्ती झाल्यानंतर कक्ष अधिकारी संवर्गात सरळसेवेने रिक्त पद उपलब्ध नसल्यास, सरळसेवेच्या जागेवर कार्यरत असणाऱ्या कनिष्ठतम कर्मचाऱ्याला पदावनत करण्याच्या अधिन राहून सदर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

..२/-